# स्त्रीयांच्या आत्मचरित्रांची शिर्षके आणि अर्पणपत्रिका

**प्रा.डॉ.बापू जी घोलप**
**मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड.४३११२६**
**भ्रमनध्वनी : ७५८८०५७६९५**

स्त्री आत्मचरित्रांच्या रचनातंत्राचा अभ्यास करताना त्यांनी आत्मचरित्रास दिलेले नाव अर्थात जे शिर्षक योजले आहे ते अत्यंत महत्त्वाचे असते. तसेच रचनाशैलीचा अभ्यास करताना पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेचाही विचार केला जात असतो. १९९० नंतरची स्त्री लेखिकांची आत्मचरित्रे पाहता त्यांची शिर्षके व अर्पणपत्रिका यात बरेच वैविध्य आणि काव्यात्मकेचे साम्य दिसते.

कमल पाध्ये यांनी 'बंध-अनुबंध'च्या अपर्णपत्रिकेत म्हटले आहे, 'मला अस्वस्थता समृध्दता आणि प्रसन्नता देणाऱ्या स्मृतींना ...' अर्थात हे पुढील पानापानांतला आशय वाचताना लक्षात येते की लेखिकेची अर्पणातली ही भावना काय असावी. ती एका विचारवंत लेखकाची बायको आहे. सुज्ञ अशी विचारवंतच आहे आणि हया स्त्रीने विचारपूर्वक पती-पत्नी यांच्या नात्याचे बंध-अनुबंध तपासले आहेत. किंबहुना एकुणच स्त्री-पुरुष संबंधाची, पाल्य-पालक-मित्र - मैत्रीणी इत्यादी संबंधावर सडेतोड चर्चा केलेली दिसते.

लक्ष्मीबाई टिळक यांनी 'ऊन पाऊस' हे आत्मचरित्र सहज आठवले तसे लिहिले आहे. सर्व आठवल्यावर त्यांना वाटले अबब.. केवढा पल्ला गाठला आपण. वाटेत किती खाच-खळगे लागले. सुख दु:खाच्या किती परि अनुभवल्या संकटे पाहिली आणि बहुदा याचा आठव होवूनच लक्ष्मीबाईंनी  हे सुख-दुखः निर्दशक 'ऊन पाऊस' शिर्षक निवडले आहे. जे जीवनातल्या रंगअनंगाचेही सुचन करताना दिसते. ऊनपाऊसाच्या प्रास्तावनेमध्ये उषा हस्तक यांनी म्हटले आहे की, 'लक्ष्मीबाईसारख्या सुशिक्षित नसलेल्या परंतु सुसंस्कृत असलेल्या आपल्या समाजातील स्त्रीया कोणत्याही न्युनगंड न बाळगता आत्मविश्वासाने लिहू लागल्या. तर त्या कोणत्या अनुभवांची दालने खुली करु शकतात, आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा कोणता तपशील पुरवू शकतात, अकृत्रिम अशा मराठी भाषेत किती सहजपणे लिहू शकतात हयाचे प्रत्यंतर लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रे नंतर पुन्हा एकदा ऊनपाऊस हया पुस्तकाने वाचकांना येऊ शकेल.' हस्तक यांचे उपरोक्त विवेचन अगदी सार्थ असून स्मृतीचित्रकार लक्ष्मीबाई व ऊनपाऊसकार लक्ष्मीबाई यांच्या नावात साम्य पाहता दोन्ही लक्ष्मीबाईंना सरस्वतीचा वरदहस्त होता असेच म्हणावे लागेल.

इंदुमती जोधळे यांच्या 'बिनपटाची चौकट' हया शिर्षकाला खुप अर्थपूर्णता आहे. जन्मभर त्या व त्यांची भावंडे अनाथ राहिले. कुणाचा आधार नव्हता. घर नव्हते. घर होते, त्यालाही होते तेव्हा घरपण नव्हते. हया अर्थाने त्यांनी बिनपटाची चौकट हे अर्थपूर्ण संबोधन वापरलेले आहे. डॉ. गजानन गायकवाड आणि अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे यांच्यामुळे ती आयुष्यात उभी राहू शकली आहे. त्यामुळे त्यांना आपला पहिला ग्रंथ अर्पण करताना ती म्हणते, 'लहान वयातच आयुष्याचा रस्ता ओलाडण्याचे सामर्थ्य ज्यांनी दिले ते पूज्य कै. गजरननराव गायकवाड आणि तेथून पुढे इच्छित स्थळ गाठण्याचा आवघड मार्ग सुकर करुन दिला ते पुज्य कै. अण्णासाहेब सहस्त्रबुंदधे यांना कृतज्ञतापुर्वक ...' अर्पण केलेला आहे.  आत्मचरित्रात त्यांच्या आठवणी सांगून पुनश्च कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. यातील अण्णासाहेब सहस्त्रबुदधे यांचे व त्यांच्या मदतीचे उल्लेख समिधा, भोगले जे दुखः त्याला, बंध-अनुबंध याही आत्मचरित्रात आलेले आहेत. ही लक्षणीय गोष्ट आहे.

मंगला भागवत यांच्या 'कुण्या एकीचे अंतरंग' हया नावापासून लेखिकेची स्वत:कडे पाहण्याची त्रयस्त वृत्ती दिसून येते. तसेच आपण आरंभीलेल्या स्त्रीमुक्ती कार्यात 'मी म्हणजे मी अन् भोपळयातलं बी'अशी स्वत:पुरती स्तुतीची भूमिका नसून तुमच्या आमच्यातल्या कुण्या एकीचे हे आत्मचरित्र आहे. माझ्यापुरते माझे नाही. बऱ्याच जनींचे ते सुख:दुख सूचक आहे असा त्यातून अर्थ ध्वनीत होतो. तो योग्य आणि अत्यंत बरोबर वापरला आहे.

विशेष म्हणजे कुण्या एकीचे अंतरंग ला लेखिकेने अर्पणपत्रिकाच दिलेली नाही. अर्थात अवघे जीवन समाजाला समर्पीत होते हे विदीतच आहे. पुस्तकास स्वागत म्हणून प्रस्तावना लिहितात डॉ. सरोतिनी वैदय म्हणतात की, 'गेल्या

पस्तीस-चाळीस वर्षात मराठीमध्ये स्त्रीयांची आत्मकथने पुष्कळ प्रसिध्द झाली आहेत. त्यापैकी पुष्कळशी आपल्या कौटूकबिक सुख दु:खाची कथा, पतीला केंद्रस्थानी ठेवून सांगणरी आहेत व काही मोजकी आपल्या विशिष्ट कार्यक्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून त्या अनुषंगाने वैयक्तिक कथा सांगणारी आहेत. मंगलाबाईंची आत्मकथा हया दुसऱ्या गटातील आहे . आत्मचरित्राच्या शिर्षकातूनही लेखिकेला असाच अर्थ सुचित करावयाचा असावा.

रागीणी पुंडलिक यांच्या 'साथसंगत' या संधी नावावरुन लक्षात येते की हे सहजीवनावर आधारीत आत्मचरित्र आहे. आपल्या प्रतिभावान गुणी नवऱ्याचे कौतुक करीत करीत त्याच्या साहित्यावर प्रकाश टाकणारे आत्मचरित्रातील घटनाप्रसंग आहेत. त्या दृष्टीने साथसंगत हे नाव सार्थ आहे.

आत्मचरित्राच्या शेवटी साथसंगत ध्यानी घेऊनच त्या लिहीतात, 'माणसाच्या मागचं एकटेपण कधीच सुटत नाही. हयांच्याच साहित्यातलं हे वाक्य. आता हेच एकटेपण वाटयाला आलंय. दुपार झाली की करमेनासं होतं. मग एकटीच खूर्चीत बसून हयांच्या बरोबर घालवलेल्या सहजीवनातील क्षणन्‌क्षण मी डोळयांसमोर आणत राहते आणि त्या आठवणीत परत परत रममान होत जाते.'

'जगायचय प्रत्येक सेकंद' मध्ये मंगला केवळे यांनी मुख्यत: आपल्या पतीच्या जीवनप्रवासाची सर्व हकिगत सांगितली आहे. स्वत:ची त्यातली एक मुख्य भूमिका तेवढी मांडली आहे. म्हणजेच हेही पती एके पती छापाचे स्त्री आत्मचरित्र आहे. परंतु यातील डॉ.केवळे अत्यंत गरीब हालआपेष्टातून जीवनाशी झुंज देणारे सद्‌गृहस्थ होते. त्यांचे अचानक अपघाती निधन झाले आहे. त्यांच्यानंतर पत्नी व मुलगी एकटयाच पडल्या. तेव्हा काय करावे तर पतीची जिद्द लक्षात घेऊन लेखिकेने ठरवले जगाचंय ... प्रत्येक सेकंद.

विदयादेवी परचूरे यांनी आपले आत्मचरित्र, 'जीने सारा जन्म सोशीतच काढला आणि मला सहनशिलतेचा केवळ वारसाच नव्हे तर वस्तुपाठ दिला त्या मातृदेवतेस ....' अर्पण केलेले आहे. त्यांनी 'वंचिता' हे आत्मचरित्राचे शिर्षक आपली पतीकडून जी उपेक्षा झाली त्या अर्थाने व त्यांच्या आईचीही तिच्या पतीकडून जी अवहेलना झाली त्या अर्थाने वापरले असल्याचे दिसते.

'स्मृतीसुगंध' हे चंपा लिमये यांचे पती एके पती छापाचे पट्टितील आत्मचरित्र असून पती ख्रा. मधु लिमयेचा सुगंध आत्मचरित्र भर दरवळ्ला असल्याचे दिसते. वास्तविक चंपाबाईंना नवरा स्वत:च्या स्मृतीसंपुष्टातील मर्यादीत माणूस ठेवण्यापेक्षा तो देशाचा नेता होता त्या दृष्टीने खूप समकालीन राजकारण समाजकारणावर भाष्य करता आले असते. पण जे थोडे थिडके त्या बोलल्या आहेत त्यातुन त्यांचा कोता व संकुचित असा दृष्टिकोनच स्पष्ट होताना दिसतो. त्यामुळे त्यांच्या हया स्मृतींचा आनंद त्यांच्या पुरताच मर्यादित राहतो. तुम्हा -आम्हाला वाचकांना काही देतो असे दिसते नाही.

कुन्दा जगदाळे यांनी आपल्या प्रेमिकास व प्रियकर पतीस आत्मचरित्र वाहिलेले आहे. त्याची 'गुलमोहर' ही शिर्षक योजना प्रेम-रोमांन्स सूचक आहे. यात लेखिकेने नेमका उन्हळयात वसंतात गुलमोहर अगदी फुलाफुलांनी डवरुन येतो तसा आपला वैवाहिक व प्रेम-जीवनाच्या वसंतबहार आठवणी दिल्या आहेत. हया मराठमोळ्या स्त्रीने ख्रास आपल्या अस्सल भावनांची कदर करुन हा मोहर पानपानभर उधळीला आहे. तो वाचकांना निश्चित मोहविणारा आहे.

यशोदा पाडगावकरांनी आत्मचरित्राला अर्पणपत्रिकेची पुस्ती जाडलेली दिसत नाही. पण 'कुणास्तव कुणीतरी...' हया चोख्रंदळ काव्यपूर्ण शिर्षक योजनेबद्दल मनोगतात म्हटले आहे, 'मी हे लेख्रन जूळत पुर्ण होत असताना या लेख्रनाचा सगळा अनुभव चपख्रलपणे पकडणारे एख्रादे शिर्षक सुचतेय का ? याची मनातल्या मनात वाट पहात होते. आणि ख्ररेच एक दिवस रे. ना. वा. टिळक यांच्या कवितेतील 'कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरी 'ही ओळ तरळत बघता बघता मनात उतरली अणि माझ्या लगेचच लक्षात आले की कुणास्तव कुणातरी हेच आहे मी वाट पाहत असलेल्या कवितेचे शिर्षकाचे नाव.'

सरस्वतीबाई अकलुजकर यांनी आपले 'आठवणी काळाच्या ... माणसाच्या' हे आत्मचरित्र अर्पण करताना म्हटले, 'ज्यांच्यामुळे आयुष्य उजळल्याचं समाधान मनाला लाभल त्या चि. मधुसूदन, सौ. सरोजिनी, चि. यशवंत , चि अशोक या माझ्या मुलांना आणि चि. बाळ व सौ. इंदुवन्सं या माझ्या भाऊ भावजयीला सप्रेम भेट' उपरोक्त मुलांना बंधुला अर्पण केलेले दिसून येते. यात अकलुजकरांना समकालीन मध्यमवगीय स्त्रीयांच्या व्यक्तीगत जीवनाला असाणार

सामाजिक सांस्कृतिक परिणाम अत्यंत ताकदीने उभे केलेले आहे. म्हणूनच हया आत्मचरित्राचे नाव ठरीव ठशाचे काव्यात्म वैगेरे अर्थगर्भ न वाटनारे नाव सरळ काळाच्या व माणसांच्या आठवणी सुचवणारे योग्य व सार्थ आहे. अर्थात ते वाखानण्याजोगे निश्चितच आहे.

शिरीष पै यांनी 'हाती शिल्लक' आत्मपर ललित लेखांचा संग्रह 'परमप्रिय मोहन वाघ यांना अर्पण' केला आहे. या संग्रहात हाती शिल्लक नावाचा एक लेख दिला आहे. त्या लेखात लेखिकेने अत्यंत बोलकी व जीवनाच्या शेवटी वळून पाहता काय शिल्लक राहते हयाचे सूचन करणारी कविता दिलेली आहे. लेखिका एक संवेदनशील कवयित्री म्हणून प्रसिध्द आहेच. हया आत्मचरित्मक लेखात त्यांच्या कवी मनाची भावस्पंदने जागोजाग उमटली आहेत. आयुष्य संपता संपता नव्या जीवनाचा कोंब, नवी आशा आपल्या हाती देत असल्याचे त्या म्हणतात. हे आत्मपर लिखाना गतआयुष्याकडे शोधकपणे आणि चिकित्सकपणे पाहणारे आहे. लेखिका स्वत: कडे पाहताना जे मिळाले नाही त्याबद्दल लिहून थांबत नाही तर इतरांना ती जे देऊ शकली नाही त्या विषयीही लिहिलेले आहे.

'समिधा' ही साधना आमटे यांच्या समर्पित जीवनाची गाथा आहे. ७६वर्षे सहजीवनात  झालेल्या त्या वाळा आयुष्याचे हे आत्मगान आहे.  देवाच्या मुर्तीवर आपण जी फळे, पुष्पे, पाने, दुर्वा वाहतो त्या सुकून वाळून गेल्यावर जे निर्माल्य उरते त्याला समिधा म्हणतात. हया अर्थी आपल्या जीवजन्माची  समिधा साधनाताईंना अपेक्षित दिसते. त्यांच्या हस्ताक्षरात पहिल्या पानावर एक उतारा छापलेला आहे. त्यात त्या म्हणतात, 'विस्मृतीच्या अंधारात चालताना मनावरचे मळभ कधी तरी अचानक दूर होते. काळोखाच्या सावल्यांतून दूरवर स्मृतींचे दीपक खुणावू लागतात. पाणवलेल्या पापण्यांच्या कडांशी प्रतारणा करणारे शब्द वैरी होतात. ते सैरावैरा धावतात. त्यांच्या शिस्तबध्द रांगा लावून लागत नाहीत. मन आक्रंदू लागते. क्षणभराने आठवणींचे तरंग विरतात अन् परत सारे काही स्तब्ध होते. स्मृतीच्या हिंदोळयावर झुलताना जे हाती गवसले ते तुमच्या समोर ठेवीत आहे. जे विस्मृतीच्या गर्तेत गेले ते प्रभूचे देणे होते. त्याचे त्यानेच सव्याज परत नेले.' आठवणी देखील इश्वरार्पण करणारी ही महान समाजसेविका मोठया विरक्त भावनेने जन्माची समिक्षा करताना दिसते.

'आठवले तसे' हया आत्मचरित्रात्मक लेख संग्रहात लेखिका दुर्गा भागवत यांनी सूचतील तसे आठवतील तसे छोटे छोटे लेख लिहिले आहेत. व्यक्तींची नावे काही लेखांना योजून संबंधीत आठवणी दिलेल्या आहेत. म्हणून त्याचे नावही त्या सहज साधे आठवले तसे योजताना दिसतात.

'भाळी गोंदण चांदण' हे निर्मला देशपांडे यांचे आत्मचरित्र स्त्रीच्या मनातली धुपणारी वेदना सांगते. ती धडधडता ज्वाला अथवा निखारा वाटत नाही. स्त्रीच्या माथी गोंदलेले असतं, त्यावर विवाहानंतर ती कुंकु लावते. कालांतराने तेही अचानक पुसून जाते. पती जातो तेव्हा पुन्हा राहते भाळी गोंदण चांदणं. अर्थात स्त्रीजन्माचा कधीच न पुसून जाणारा दैवलिखीत विधीलिखीत संकेत लेखिकेला या शिर्षकातून सूचवायचा असावा. शिर्षक खुप अर्थसूचक आहे.

'योगायोग' हे उषा दर्डा यांचे आत्मचरित्र मानवी जन्मात नियती कुठून कुठे बसवते हेच सूचवते. पण लेखिकेचा योगायोग म्हणण्या मागचा उद्देश अधिक तर योगायोगाने मंत्री नवरा मिळाला व नावलैविक मिळाला, सारी सुखे मिळाली एवढयाशीच संबंधीत आहे असे आत्मचरित्र वाचताना वाटते.

'पानगळीच्या आठवणी' हे शोभा चित्रे यांचे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्यासंबंधी वृध्दांच्या उतारवयाच्या आठवणी सांगणारे आहे. अर्थात शिर्षक योजना त्यांनी तशीच केली आहे. आत्मचरित्रात त्यांनी आपल्या सासऱ्याचा स्मृतिभंगाचा आजार , उपचार  व मृत्यू यांचा विस्ताराने व सविस्तर आढावा घेतलेला आहे. तसेच आपले आई-वडिल यांच्या मृत्यूची दखलही मन हेलावणारी अशी आहे. अर्थात हया सगळ्या मृत्यूच्या वृध्दत्वाच्या आठवणी म्हणजेच पानगळीच्या आठवणी आहेत.

सिंधु कानेटकर यांनी आपल्या यांनी आपल्या सहजीवनाची व आपल्या सासू-सासरे, दीराची व इतरांच्या सहजीवनाची साथसोबतीची मधुर गोष्ट आत्मचरित्रात दिली आहे. आठवणीचा विषय त्यांना साथीदाराशी केंद्रीत ठेवलेला आहे. त्याचेच सूचक 'साथसोबत' हे शिर्षक योजले आहे. ते अगदी सार्थ आहे.

नसिमा हुरजूक यांनी आपले 'चाकाची खूर्ची' हे आत्मचरित्र, 'चाकाची खूर्ची सतत फिरती ठेवणाऱ्या स्वप्नांना...'

अर्पण केलेले आहे. त्या पॅराप्लेजिक पेशंट होत्या. वयाच्या १८व्या वर्षीपासून त्या अपंगासाठीच्या चाकाच्या खूर्चीत बसल्या पण आकांक्षाना गगन ठेंगणे असे त्यांनी काम केले. पाय असणारी स्त्री एवढी फिरणार नाही धडपडणार नाही इतकं त्यांनी चाकाच्या खूर्चीला फिरवले आहे. अपंगांसाठी काम केले आहे.

१९९० नंतरच्या स्त्रीयांच्या आत्मचरीत्रात खास मानाचा मुजरा करावा लागेल तो २००८ साली प्रकाशित झ्ालेल्या आशा अपराद यांच्या ‘भोगले जे दु:ख त्याला’ हया आत्मचरित्रास. या लेखातील ही सर्वोत्कृष्ट कलाकृती ठरु शकेल. हे मोलाचे लिखाण असून स्त्री वाङ्मयातला तो हिमालय ठरेल. स्त्री आत्मचरित्र लेखनातला एक मैलाचा दगड ठरेल. ‘माझ्या आयुष्याच्या खडतर वाटचालीत माझ्याशी जात-धर्म, वर्ग,लिंगभेदाच्या पलीकडलं नातं जोडून जे पाथेय समाजाने मला दिले त्या प्रेमळ हातांना अत्यंत कृतज्ञातापूर्वक..’ अर्पण अशी ओजस्वी आणि भव्य व्यापक भावना व्यक्त करणरी अर्पण पत्रिका सलामीलाच वाचकांना आपलं करुन टाकते. ह्रा आत्मचरित्राचे शिर्षक फार बोलके असून जे दु:खाचे कढत कढत कढ स्त्रीने सोसले तिलाच त्याची वेदना कळू जाणे असे त्या म्हणतात. अगदी आत्मचरित्राचे मुखपृष्ठही अत्यंत बोलके असुन तबकात भरलेल्या उष्ण विस्तवातून निखाऱ्यातून स्वातंत्र्याचा पांढरा पक्षी उत्तुंगतेची झेप घेतो आहे असे त्यात सूचवले आहे.

सारांश, अशा प्रकारे स्त्री आत्मचरित्राच्या शिर्षकांचा विचार करता ती आशय सूचक अशीच योजलेली दिसतात तर बरेचशी सहजीवन सूचक आहेत. बहूतांश लेखिकांनी अर्पणपत्रिका लिहिलेल्याच नाहीत. ज्यांनी योजल्या त्या पतीला अर्पण केल्या आहेत. सासूला अर्पण केलेल्या आहेत.एकुणच स्त्रीयांच्या आत्मचरित्रातून दबलेल्या अर्ध्या जगाची माहिती उघड होते.

**संदर्भ ग्रंथ:-**


१ इंदुमती जोंधळे -बिनपटाची चौकट

२ ऊन-पाऊस -लक्ष्मीबाई टिळक-

३ मंगला भागवत -कुण्या एकीचे अंतरंग

४ रागिनी पुडंलिक -साथसंगत

५ मंगला कवळे -जगायचंय प्रत्येक सेकंद

६ यशोंदा पाडगावकर -कुणास्तव----कुणीतरी

७ शिरीष प -हाती शिल्लक

८ साधना आमटे -समिधा

९ नसिमा हुरजूक -चाकाची खूर्ची

१० शोभा चित्रे -पानगळीच्या अठवणी

११ निर्मला देशपांड -भाळी गोंदण चांदणे

१२ उषा दर्डा -योगायोग

१३ दुर्गा भागवत -आपठवले तसे

१४ सरस्वतीबाई अकलुजकर-अठवणी काळाच्या--मानसाच्या

१५ कुन्दा जगदाळे -गुलमोहर

१६कमल पाध्ये -बंध-अनुबंध

१७ सिंधु कानेटकर - साथसोबत

१८ चंपा लिमय - स्मृतीसुगंध

१९ विदयादेवी परचूर -वंचिता



**प्रा.डॉ.बापू जी घोलप**

**मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड. ४३११२६**

**भ्रमनध्वनी : ७५८८०५७६९५**